# ४) श्री गुरू (शिक्षक/अध्यापक) आचार्य

**ह. भ. प. श्री. सुभाष महाराज गेठे**

शिक्षण क्षेत्रात गुरूचे अथवा शिक्षकांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे, जे विद्यार्थ्यांना ज्ञान देऊन त्यांच्या ठिकाणचे अज्ञान, गैरसमजूत दूर करतात. किवा जे सत्याचा बोध करून देतात, त्यांना 'गुरू' असे म्हणतात. आपण या सृष्टीत प्रत्येकाकडून काही ना काही प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष शिकत असतो. या अर्थाने सामान्य पद्धतीने तेही आपले गुरूच असतात. आई-वडील, शिक्षक, निसर्ग हे आपणास सतत काही तरी नवीन शिकवत असतात. त्यामुळे हे सर्व गुरूच आहेत, असे मानले जाते. या सृष्टीत चौघांना प्रत्यक्ष दिसणाऱ्या देवताच मानल्या जातात.

मातृ देवो भव।, पितृ देवो भव।, आचार्य देवो भव।, अतिथी देवो भव याचा अर्थ आई- वडील, शिक्षक आणि अतिथी यांना देवत्वाचा दर्जा भारतीय सनातन संस्कृतीने प्रदान केलेला आहे.

शिक्षण क्षेत्रात सर्वप्रथम स्थान प्राचीन काळापासून केवळ शिक्षकांनाच दिलेले आहे. दुसरे स्थान विद्यार्थ्यांना दिलेले आहे. शिक्षकांना विद्या द्यायची असते, आणि विद्यार्थ्यांना विद्या घ्यायची असते, म्हणून शिक्षक आणि विद्यार्थी यांना जोडणारा दुवा म्हणजे विद्या. ही विद्या देताना (शिकवताना) शिक्षक त्यांच्या विषयामध्ये तज्ज्ञ असावा लागतो. त्याचे सांगोपांग त्या त्या विषयाचे ज्ञान अद्ययावत असावे लागते. त्यालाच 'श्रोत्रिय' असे पारिभाषिक नाव आहे.

तसेच शिक्षक हा शैक्षणिक मूल्यांशी त्यांच्या संपूर्ण जीवनात एकनिष्ठ असायला हवा. थोडक्यात, त्याची ज्ञानाच्या ठिकाणी पूर्ण

निष्ठा हवी. त्यालाच पारिभाषिक शब्दात ‘ब्रह्मनिष्ठ’ म्हणतात. माझ्या ठिकाणचे असलेले ज्ञान मी सर्वांना समानतेने आणि संपूर्णतेने देत राहील, अशी विद्यार्थ्यांच्या संबंधाने शिक्षकांच्या अंतःकरणामध्ये असलेली कणव / तळमळ त्यालाच ‘कृपाळूता’ असे शास्त्रीय भाषेत म्हणतात. ‘आपला विद्यार्थी आपल्यापेक्षाही मोठा आणि प्रसिद्ध होताना शिक्षकांना होणारा आनंद हा अमर्याद व अनंत असतो.’ थोडक्यात, शिक्षकाचे शिकवणे हे श्रोत्रीय, ब्रह्मनिष्ठ आणि कृपाळू या सद्‌गुणाने युक्त असेल, तर ‘शिकवणे’ हा विद्यार्थी आणि शिक्षक यांना जोडणारा घटक असतो. विद्यार्थी आणि शिक्षक यामध्ये किंचीतही द्वेष–भावनेचा गंध नसतो व नसावा, तरच उभयतांची विद्या यशस्वी आणि फलद्रुप होईल अशी आदर्श शिक्षणाची संकल्पना भारतात गुरुकुल पद्धतीने चालत आलेली आहे.

उपरोक्त विचारांचा निष्कर्ष खालील उपनिषद मंत्रात दिसतो.

१. आचार्य पूर्वरूपम् । २. अन्तेवास्युत्तररुपम् । विद्या सन्धिः । ४) प्रवचनगं सन्धानम्।

अध्ययनाला सुरुवात होण्यापूर्वी विद्यार्थी आणि शिक्षक एकत्रित येऊन अशी प्रार्थना करतात की, “**सहनाववतु । सह नौ भुनक्तु । सहवीर्यंकरवावहै । तेजस्विनावधीतमस्तु मा विद्विषावहै।।**”

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांनी संपूर्ण ज्ञानेश्वरीचे श्रेय हे आपल्याकडे न घेता, ज्ञानेश्वरी म्हणजे गुरुकृपेचे वैभव आहे, असे उद्‌गार काढले आहेत.

**तैसें श्रीनिवृतीनाथाचें । गौरव आहे जी साचे ।**
**ग्रंथु नोहे हे कृपेचे । वैभव तये।।१७५०।।** अ. १८

प्रत्येक अध्यायाच्या आरंभी, मध्ये आणि अंती जिथे संधी भेटेल तिथे गुरूंचे वर्णन केलेले आहे. कळसूत्री बाहुल्यांना स्वतःला

स्वतःचे कोणतेही कौशल्य नसते, परंतु ज्याच्या हातात दोऱ्या आहेत असा सूत्रधार आपल्या कौशल्याने त्या बाहुल्यांना नाचवीत असतो. त्याप्रमाणे श्री ज्ञानेश्वर महाराज स्वतःला कळसूत्री बाहुल्या समजतात आणि श्रीगुरू निवृत्तीनाथांना सूत्रधाराच्या ठिकाणी समजतात. म्हणजे माझ्याकडून जे ही काही घडते ते घडवून घेणारे माझे गुरूच आहेत, अशी माउलींची मान्यता आहे.

**आता देईजो अवधान । तुम्हीं बोलविल्या मी बोलेन ।**
**जैसे चेष्टे सूत्राधीन । दारूयंत्र।।८१।।** अ.१

यातून गुरूंच्या विषयी अतिशय आदर व्यक्त करून स्वतःकडे न्यूनता घेतली आहे. आपल्या गुरूंच्याविषयी आदर व्यक्त करताना माउलींनी आपल्या गुरूंना कधी आईची तर कधी भगवान गणेशाची, सरस्वतीची, सूर्याची, चंद्राची, सागराची तर कधी कूर्मदृष्टीची उपमा देऊन गुरूंनाच देवत्वाच्या भूमिकेत पाहिले आहे.

**जय जय आचार्या । समस्तसुरवर्या ।**
**प्रज्ञाप्रभात सूर्या । सुखोदया।।१।।** अ. १४

**जय जय सर्व विसांवया । सोऽहंभावसुहावया ।**
**नाना लोक हेलावया । समुद्रा तूं।।२।।** अ. १४

श्री ज्ञानेश्वर महाराज गुरूच्या ठिकाणी अनेक महत्त्वाच्या सद्गुणांचे दर्शन घडवितात.

## १) नमो विशदबोध–विद्ग्धा ।

कितीही दुर्बोध, अवघड आणि क्लिष्ट विषय जरी असला तरी विद्यार्थ्यांना आपल्या कौशल्याने, हातोटीने अशा पद्धतीने शिकवितात की तो विषय सहज कळेल. त्यामुळे विद्यार्थ्यांची त्या त्या विषयांमध्ये अभिरुची उत्पन्न होईल. थोडक्यात, आदर्श शिक्षक ते की जे

विद्यार्थ्यांना अवघड विषय समजून सांगण्यात पारंगत आहेत.

**२) तुमचा अनुग्रहो गणेशु । जैं दे आपुला सौरसु ।**
**तैं सारस्वतीं प्रवेशु । बाळकाही आथी।।६।।** अ. १०

गुरू विद्यार्थ्यांना अशा पद्धतीने शिकवितात, की त्यांच्यासाठी स्वतः बुद्धीची अधिष्ठात्री देवता भगवान गणेश बनतात.

विद्यार्थ्यांच्या बुद्धीचा विकास करून स्वतःच सरस्वतीच्या रूपाने विद्यार्थ्यांच्या मनात विद्येच्या रूपाने प्रवेश करतात.

**अहो सद्‌गुरुचिये कृपादृष्टी । तुझे कारुण्य जयातें अधिष्ठी ।**
**तो सकळ विद्यांचिये सृष्टी । धात्रा होय।।९।।** अ. १२

सर्वांना उद्देशून श्री संत ज्ञानेश्वर महाराज श्रीगुरूंच्या विषयीचा आदर एक महत्त्वाचा सिद्धांत सांगून जगजाहीर करतात. शिक्षकांचे शिकवणे जितके महत्त्वाचे असते त्याहीपेक्षा माझ्या ठिकाणी जे ज्ञान



आहे ते माझ्या विद्यार्थ्यांना सर्व समजावे अशी मनातून जी तळमळ, त्या तळमळीच्या दृष्टीतून विद्यार्थ्यांकडे पाहून जेव्हा शिकविले जाते तेव्हा खरोखर शिकविण्याचे कौशल्य आणि तळमळ या दोन्हींच्या माध्यमांतून विद्यार्थ्यांना तो शिकविलेला विषय इतका चांगला समजतो की त्या विद्यार्थ्यांच्या विद्वत्तेची तुलना ब्रह्मदेवाशी करतात.

**म्हणोनि जाणतेनें गुरु भजिजे । तेणें कृतकार्य होईजें ।**
**जैसें मूळसिंचने सहजें । शाखापल्लव संतोषती।।२५।।** अ. १

**तैसा पुढतपुढती तोचि । मियां अभिवंदिला श्रीगुरुचि ।**
**जो अभिलषित मनोरुचि। पुरविता तो।।२७।।** अ. १

स्वभावतःच विद्यार्थ्यांच्या मध्ये जे सुप्त कला, गुण, अभिरुची इ. गुण ओळखून त्याप्रमाणे जे मार्गदर्शन करतात आणि विद्यार्थ्यांच्या मनातील अभिरुची विकसित करतात, ते आदर्श शिक्षक होय. म्हणून जिज्ञासू असणाऱ्या विद्यार्थ्यांनी योग्य आणि तज्ज्ञ शिक्षकांशी नेहमी अनुसंधान ठेवावे.

झाडाच्या मुळाशी पाणी घातले असता पाने, फुले आणि फळे हे जसे टवटवीत होतात, तसे शिक्षकांशी अनुकूल राहिले तर विद्यार्थ्यांच्या मध्ये ज्ञानरूप फळाची वृद्धी होते. ज्ञानासारखी पवित्र या जगात दुसरी कोणतीच वस्तू नाही. ते ज्ञान प्राप्त करताना विद्यार्थ्यांनी शिक्षकांना नेहमी आदराने मानवंदना द्यावी. म्हणजेच नमस्कार करावा. काही महत्त्वाचे काम सांगितले, तर सेवावृत्तीने करावे. काही शंका राहिली तर योग्य वेळेस शंकेचे निरसन करावे. यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या मनात गुरुजनांविषयी श्रद्धा ठेवावी. ज्ञान घेण्यासाठी नेहमी तत्पर असावे आणि आपल्या इंद्रियांचे दरवाजे फक्त आणि फक्त ज्ञानासाठी ज्ञानार्जनाच्या काळात उघडे ठेवावेत. इतरत्र लक्ष देऊ नये.

**विद्यार्थ्यांचे पात्रता गुण :**

१) नमस्कार, २) सेवा, ३) जिज्ञासा, ४) श्रद्धा, ५) तत्परता, ६) इंद्रिय संयम.

हे पथ्य प्रत्येक विद्यार्थ्याने काळजीपूर्वक पाळले तर सर्वच यशस्वी होतील, अशी श्री ज्ञानेश्वर महाराज ग्वाही देतात.

**तें ज्ञान पैं गा बरवें । जरी मनीं आथि आणावें ।**
**तरी संतां यां भजावें । सर्वस्वेसीं।।१६५।।**

**जे ज्ञानाचा कुरुठा । तेथ सेवा हा दारवंटा।**
**तो स्वाधीन करी सुभटा । वोळगोनी।।१६६।।**

**तरी तनुमनुजीवे । चरणासी लागावें।**
**आणि अगर्वता करावें । दास्य सकळ।।१६७।।**

**मग अपेक्षित जें आपुले । तेही सांगती पुसिलें।**
**जेणे अंतःकरण बोधलें । संकल्पा नये।।१६८।।** अ. ४